# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
# (म्हाडाचा घटक)

## म्हाडातर्फे मुंबई शहरामधील ५८ बंद/आजारी कापड गिरण्यांतील गिरण्यांमधील घरासाठी अर्ज केलेल्या गिरणी कामगार / वारसांसाठी

## जाहीर सुचना

मुंबई शहरामधील ५८ बंद/आजारी कापड गिरण्यांतील ज्या कामगारांनी एका गिरणी कामगाराचे नावे एकापेक्षा जास्त अर्ज केल्याचे आढळून आले असुन अशा गिरणी कामगार / वारसांची यादी तसेच एक अर्ज कायम ठेवून इतर अर्ज रद्द करण्याबाबतच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना म्हाडाचे संकेतस्थळ https://mhada.maharashtra.gov.in वर दि. ०२ /०८/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात येवून म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीमधील एकापेक्षा जास्त अर्ज सादर केलेले आहेत अशा गिरणी कामगार / वारस यांनी विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र व्यक्तीशः उपस्थितीत राहून सादर करणेबाबत तसेच या यादी व्यतिरिक्त ज्या गिरणी कामगार/ वारसांनी एकापेक्षा जास्त वेळा अर्ज सादर केले आहेत अशांनी सुध्दा विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करण्याबाबत अर्जदारांनी नेमका कोणता अर्ज कायम ठेवायचा व कोणता रद्द (कमी) करावयाचा आहे, याबाबत लेखी स्पष्ट निवेदन देणबाबत आवश्यक पुराव्यासह दि. ०२/०८/२०१९ ते दि. १४/०८/२०१९ पर्यत कार्यालयीन दिवशी सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत प्रतिज्ञापत्र सादर करण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

तसेच ज्या अर्जदारांनी चुकीच्या गिरणी संकेत क्रमांकामध्ये अर्ज सादर केले आहेत अशा अर्जदारांना गिरणी संकेत क्रमांकामध्ये दुरुस्ती करण्यासाठी आवश्यक पुराव्यासह दि. ०२/०८/२०१९ ते दि. १४/०८/२०१९ पर्यत कार्यालयीन दिवशी सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत प्रतिज्ञापत्र सादर करण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर दोन्ही कालावधीस या सुचनेव्दारे दि.२३/०८/२०१९ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**<u>अर्ज सादर करण्याचा पत्ता</u>**

उपमुख्य अधिकारी (धापुप्र/गिरणी) / मुं.मं.<br>
कक्ष क्र.२०५, पहिला मजला, गृहनिर्माण भवन,<br>
कलानगर, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१<br>
हेल्प लाईन नं. ९८६९९८८०००

(राधाकृष्णन् बी.)<br>
मुख्य अधिकारी<br>
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,मुंबई